MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक - दिपक थोरात

अपघातातील गंभीर जखमी उमेश सांगुळे यांचा देखील दुर्दैवी मृत्यू

एकाच अपघातात दोन सख्खे भाऊ गेल्याने उमापूरकरावर दु:खाचे सावट

उमापूर /प्रतिनिधी

उमापूर येथील सांगुळे कुटुंबाचा झालेल्या अपघातात एक भाऊ दादासाहेब भगवानराव सांगुळे हे जागीच ठार झाले होते.तर दुसरे भाऊ उमेश भगवानराव सांगुळे हे गंभीररीत्या जखमी झाले होते. त्यांना उपचारासाठी सुरुवातीला बीड आणि नंतर संभाजीनगर येथे हलविण्यात आले होते. दीड दोन दिवसाच्या नंतर झुंजीनंतर अखेर त्याचाही मृत्यू झाला.खरंतर दोन सख्खे भाऊ जाणे ही उमापूर मधील पहिलीच घटना आहे. ब्रह्म विष्णू महेश यांच्या सारखे तिघेही भाऊ सोबत सुतारकीचा व्यवसाय करायचे. गुण्यागोविंदाने आनंदात राहायचे, आणि ज्यांच्या कामावर जायचे ते पण तिघा भावांच्या मैत्रीपूर्ण संबंधाला पाहून आनंदित व्हायचे.पण काय परवाचा दिवस आणि आजचा दिवस काळा ठरला.

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष -०१ अंक -२१० सोमवार दि.२२ एप्रिल २०२४ आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-01 Issue -210 MONDAY DT. 22 APRIL 2024 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

अंबाजोगाईत चाललयं तरी काय ?

दोन गटात तुफान राडा, १६ जणांवर गुन्हा दाखल

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

मराठवाड्यातील शांतताप्रिय शहर म्हणून अंबाजोगाई शहराची ओळख आहे. पण ही ओळख जवळपास पुसून गेली असून, शहरात दररोज कायदा सुव्यवस्था बिघडवणाऱ्या घटना सर्रास घडत आहेत. काल तर शहरात दोन गटात तुफान राडा झाला. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली. पाटील चौक आणि 'स्वाराती' रुग्णालयात घडलेल्या या सिनेमा स्टाईल राड्याच्या घटनेमुळे अंबाजोगाईत चाललयं तरी काय ? अशी भावना सर्वसामान्य नागरिक व्यक्त करित आहेत.

अंबाजोगाई शहरातील पाटील चौक परिसरात बच्चे कंपनीच्या मनोरंजनासाठी आनंद मेला' आला आहे. त्यामुळे सहाजिकच या परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी पहायला मिळत आहे. गर्दीमुळे गाडी लावण्याच्या कारणावरून सदर बाजार आणि बाराभाई गल्लीतील युवकांच्या दोन गटात सायंकाळी तुफान हाणामारी या ठिकाणी झाली. त्यामुळे 'आनंद मेला' चा आनंद घेण्यासाठी आलेल्या बच्चे कंपनी आणि त्यांच्या पालकांची चांगलीच धांदल उडाली. हाणामारीची तीव्रता लक्षात घेऊन पालकांनी आणि बच्चे कंपनीने आपापल्या घरचा रस्ता धरला.

हाणामारीची घटना इथेच न थांबता परत 'स्वाराती' रुग्णालयाच्या कॅज्युअलटीमध्ये घडली. याच हाणामारी करणाऱ्या दोन गटाने तिथेही गोंधळ घालत राडा केला. या घटनेचे व्हिडिओ सध्या सोशलमिडीयावर तुफान व्हायरल झाले आहेत. दरम्यान 'स्वाराती' रुग्णालयात सुरक्षा रक्षकांनी कडक पावले उचलीत गोंधळ घालणाऱ्यांचा चांगलाच समाचार घेतला. त्यामुळे परिस्थिती नियंत्रणात आली, अशी माहिती मिळाली आहे.

दरम्यान, या घटनेमुळे अंबाजोगाई शहराची पुढील वाटचाल कशी राहणार याची चाहूल लागली आहे. अंबाजोगाई शहरात काल घडलेल्या या घटनेला पोलीसांनी गांभीर्याने घेतले असून शहर पोलीस ठाण्यात १६ जणांवर कलम ३०७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा अधिक तपास अंबाजोगाई शहर पोलीस करित आहेत. अंबाजोगाई शहरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची गरज असून अंबाजोगाईकरांनीही आत्मचिंतन करण्याची गरज आहे, तरच अंबाजोगाईतील सर्वसामान्य माणूस मोकळा श्वास घेऊ शकेल.

बीडच्या टपाल खात्याकडून विमा योजनेतील वारसाला धनादेशाचे वाटप

बीड /प्रतिनिधी

तहसील कार्यालय शिरूर जिल्हा बीड येथील कार्यरत कर्मचारी श्री अजिनाथ मधुकर बांदल यांचा दिनांक ३१ /१०/ २०२१रोजी आजाराने मृत्यू झाला होता. त्यांनी दिनांक ११ जानेवारी २०२१ रोजी१० लाख रुपयाची टपाल जीवन विमा पॉलिसी घेतली होती ,त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी श्रीमती वंदना अजिनाथ बांदल यांना टपाल जीवन विमा योजनेतून १० लाख ६५ हजार १०० रुपयाचा व श्री अनिल लक्ष्मण धस यांच्या नावे असलेल्या पाच लाखाच्या पॉलिसीची रक्कम मृत्यु पश्चात त्यांची वारस पत्नी श्रीमती विजयालक्ष्मी अनिल धस यांना आठ लाख ५० हजार ४०० रुपयाचा धनादेश मा. श्री डी .आर. शिवनीकर डाक अधीक्षक ,डाक विभाग बीड, यांच्या हस्ते प्रधान डाकघर बीड येथे प्रदान करण्यात आला .

डाक जीवन विमा व ग्रामीण डाक जीवन विमा योजना कर्मचारी , शेतकऱ्यांच्या हितासाठी खूप चांगली आहे, या योजनेत कमीत कमी हप्ता व जास्तीत जास्त लाभ मिळतो ,ग्रामीण भागातील व्यापारी, शेतकरी, शेतमजूर ,लघु उद्योजक इत्यादींना दहा लाखाचा तर कर्मचारी, डॉक्टर ,इंजिनियर, डिप्लोमाधारक, पदवीधारक यांना ५० लाखापर्यंत विमा घेता येतो.आय करात सवलत , कर्जाची सोय ,वारसाचे नाव नोंदवण्याची सोय, भारतातील कोणत्याही पोस्ट ऑफिस मध्ये प्रीमियम जमा करता येतो ,प्रीमियम जमा करण्यासाठी ऑनलाइन ची सुविधा उपलब्ध अशा सर्वाधिक व सुरक्षित विमा योजनेचा सर्वांनी लाभ घ्यावा .असे आवाहन बीडचे डाकघर अधीक्षक माननीय श्री डी .आर. शिवनीकर यांनी केले आहे. याप्रसंगी प्रधान डाक घराचे पोस्टमास्तर श्री हेमंत पानखडे टपाल जीवन विमा विकास अधिकारी श्री बाबासाहेब मोरे श्री सोमनाथ खोड सीपीसीपीए अमोल निर्मळ ,अमरसिंग ढाका ,व्ही के वीर व इतर पोस्टाचे कर्मचारी उपस्थित होते .

बीड लोकसभा निवडणूकीची धामधूम चालू आहे.सोमवार दि.२२ / ४/२०२४ रोजी महा विकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.बजरंग सोनवणे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील हे बीड येथे आले होते.पोलीस मुख्यालयाच्या हेली पॅडवर पक्षातील मान्यवरांनी आ.जयंत पाटील यांचे स्वागत केले.या वेळी आ.जयंत पाटील यांनी बीड लोकसभेचे ईच्छूक उमेदवार तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल चे राज्य प्रमुख प्रा.ईश्वर मुंडे यांच्या एम.एच.४४ टी ५०० फॉर्च्युनर गाडीने हेली पॅड ते बीड राष्ट्रवादी भवन असा प्रवास केला.

परळीत दिव्यांग बांधवांनी दिले पंकजाताई मुंडेंना 'विजयी भव' आशीर्वाद

संसदेत दिव्यांग बांधवांचा आवाज बनून काम करेल पंकजाताई मुंडेंच्या भाषणाने दिव्यांगही गहिवरले !

पंकजाताई आश्वासक नेतृत्व : त्यांना साथ द्या - डॉ. संतोष मुंडे

परळी /प्रतिनिधी

दिव्यांगांच्या जीवनात आनंद यावा यासाठी मी हात नसलेल्यांचे हात, दृष्टी नसलेल्यांची दृष्टी आणि शब्द नसलेल्यांचे शब्द होईल. तुमच्यात मला देव दिसतो. तुमच्यासाठी काही तरी करू शकेल एवढी शक्ती मला मिळावी. जीवात जीव असेपर्यंत तुमच्या सेवेसाठी कशाचाही विचार करणार नाही, तुमच्या आशीर्वादाने संसदेत तुमचा आवाज बनुन काम करेल अशा शब्दांत भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज दिव्यांग बांधवांची मने जिंकली. पंकजाताईंच्या भाषणाने गहिवरून गेलेल्या दिव्यांग बांधवांनी त्यांना मनापासून 'विजयी भव' चे आशीर्वाद दिले. दरम्यान पंकजाताई हे आश्वासक आणि विश्वासक नेतृत्व असून मंत्री असताना त्यांनी दिव्यांगांसाठी निधी वाढवून दिला, आता त्यांचेसाठी काहीतरी करण्याची वेळ आली आहे, त्यांना मोठया मताधिक्याने संसदेत पाठवा असं आवाहन दिव्यांग कल्याण मंत्रालय अभियानाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांनी यावेळी केले.

पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ डॉ संतोष मुंडे यांच्या पुढाकाराने मोंढा विभागात दिव्यांग, विधवा, परितक्त्या, ज्येष्ठ नागरिक, माजी सैनिकांच्या संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी त्या बोलत होत्या. भाजपचे शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, जि.प. गटनेते अजय मुंडे, नगरसेविका उमाताई समशेट्टे, शुभांगी गिते आदी याप्रसंगी उपस्थित होते.

दिव्यांग बांधवांच्या उपस्थितीने खचाखच भरलेल्या या संवाद बैठकीस मार्गदर्शन करताना पंकजाताई म्हणाल्या, तुमची एवढी मोठी संख्या मला अंतर्मुख करणारी आहे. कलियुगात आज कुणीही समाधानी नाही, तुमच्याकडे पाहून मला तुमच्यात देव दिसतो, किती हा उत्साह..असेच आशीर्वाद मला द्या. राजकारणात आज जातीवरून एकमेकांच्या अंगावर धावून जाणाऱ्या जगात तुमच्याकडून काहीतरी शिकले पाहिजे. ज्ञान आणि पैसा देण्याएवढी मी मोठी नाही पण तुम्हा सर्वांना विश्वास मात्र नक्की देईन.

दिव्यांग भवन उभारणार

दिव्यांग बांधवांची संख्या मोठी असुन त्यांना आपल्या हक्काच्या जागेत बसुन काम करता यावे यासाठी परळी शहरात लवकरच दिव्यांग व जेष्ठ नागरीकांसाठी भवन उभारणार असल्याचे पंकजाताई म्हणाल्या.

ताई तुम्ही उमेदवार नव्हे,खासदारच ; दिव्यांगांनी दिला आशीर्वाद

दिव्यांगांशी संवाद साधतांना स्वतः पंकजाताई गहिवरून गेल्या. अतिशय मनमोकळा संवाद साधत त्यांनी त्यांची मने जिंकली. प्रचंड उकाडा होत असतानाही पंकजाताईंचे मार्गदर्शन ऐकताना असंख्य दिव्यांग व्यक्ती विशेषतः महिला भावनिक झाल्या होत्या. ताई, तुम्ही या निवडणुकीतील केवळ उमेदवारच नव्हे तर खासदार आहात. देशातुन सर्वाधिक मतांनी निवडुन येण्यासाठी आम्ही आणि आमचे आशीर्वाद सर्व तुमच्यासोबत आहोत, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

संसदेत तुमचा आवाज होईल

दिव्यांगांची सेवा ही सामाजिक कार्य करणाऱ्यांसाठी संधी आहे. समाजातील दुर्लक्षीत घटकांसाठी कार्य करण्याची शिकवण मला लोकनेते मुंडे साहेबांकडुन मिळाली आहे. खा.प्रितमताई यांनी खूप छान काम केलं. गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने दिव्यांगासाठी शिबीर घेवुन अनेक उपक्रम राबवत कृत्रिम अवयव, सायकल, कर्णबधीरांना कानाच्या मशिन असे साहित्य वाटप केले. तुमची साथ मिळाल्यास संसदेत तुमचा आवाज बनून काम करेल. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांना भेटून दिव्यांगाच्या समस्या त्यांच्या कानावर घालत प्रभावी योजना सुरु करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

राज्यात मी मंत्री असताना महिला बचतगटांना प्रोत्साहन देत शुन्य टक्के दराने कर्ज,महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करुन दिली.दिव्यांगासाठी नगरपालिका व ग्रामपंचायत अशा स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये मध्ये ५% स्वनिधी राखीव ठेवण्याचा निर्णय,दिव्यांगांच्या मानधनात वाढ असे निर्णय घेतले. महिला व दिव्यांग व्यक्तीसाठी अनेक उपक्रम राबविले असल्याचे पंकजाताईंनी सांगितले.

शिवाजीनगर हद्दीत गोविंदनगर येथे बेकायदा पिस्टील बाळगणाऱ्या

एक आरोपीस स्था.गु.शा.बीड ने केला पिस्टल व काडतुसासह जेरबंद

प्रतिनिधी । बीड

मा.विशेष पोलीस महानिरीक्षक छ.संभाजीनगर परिक्षेत्र संभाजीनगर व मा.पोलीस अधीक्षक,बीड यांनी अवैध अग्निशस्त्र बाळगणारे इसमांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने श्री.संतोष साबळे, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा,बीड यांनी अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदार यांना अवैध अग्निशस्त्र व घातकशस्त्र बाळगणारे इसमांची माहिती काढुन कारवाई करण्याबाबत आदेश दिलेले आहेत.

दिनांक २०/०४/२०२४ रोजी पोउपनि श्रीराम खटावकर व त्यांचे स्टाफ अवैध शस्त्र बाळगणारे इसमांची माहिती काढत असतांना गोपनिय माहिती मिळाली की, गोविंदनगर येथे आकाश राजेभाऊ दळवे याचेकडे एक गावठी पिस्टल आहे तो गोविंदनगर येथे उभा आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळतास पोलीस निरीक्षक श्री.संतोष साबळे स्था.गु.शा.बीड यांनी बातमी ठिकाणी पोउपनि श्रीराम खटावकर यांचे पथकास रवाना होवुन कारवाइ करण्याचे आदेश दिले .स्थागुशा पथकाने गोविंदनगर येथे रोडवर उभा असलेल्या संशयीत इसमास ताब्यात घेवुन नाव,गाव विचारले असता त्याने त्याचे नाव आकाश राजेभाऊ दळवे, वय २१ वर्षे, रा. बळवाडी, ता.जि.बीड असे कळविले व त्याचे अंगझडतीमध्ये एक गावळी पिस्टल व दोन जिवंत काडतुस मिळुन आले आहे. सदर पिस्टल व राऊंड हे विनापरवाना व बेकायदेशीर असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचे विरुध्द पो.ठा.शिवाजीनगर बीड येथे गुरनं १७८/२०२४ कलम ३,२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये दिनांक २०/०४/२०२४ रोजी गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे.

आरोपी राजेभाऊ दळवे , वय २१ वर्षे, रा. बळेवाडी ता.जि.बीड याचे कडुन एक गावठी पिस्टल किमती अंदाजे ४२,०००/- रु दोन जिवत काडतुस कि.अं.२०००/- असा ४४,०००/- रु चा मुद्देमाल जप्त करुन आरोपी व मुद्देमाल पो.ठा.शिवाजीनगर बीड यांचे ताब्यात देण्यात आलेला आहे. पुढील तपास पो.ठा.शिवाजीनगर करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.श्री.नंदकुमार ठाकूर, पोलीस अधीक्षक, बीड, श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक,बीड यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.श्री. संतोष साबळे, पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/मनोज वाघ, प्रसाद कदम, पोना/ विकास वाघमारे, सोमनाथ गायकवाड, गणेश हांगे, पोशि/सचिन आंधळे, नारायण कोरडे, अश्विनकुमार सुरवसे, चालक/सुनिल राठोड सर्व नेमणुक स्था.गु.शा.बीड यांनी केली आहे.

खडकतच्या कत्तलखान्यातील गोमांसाचे हैदराबाद कनेक्शन!

कत्तल खडकतला,साठा नगर जिल्ह्यात अन् विक्रीसाठी हैदराबाद

प्रतिनिधी । आष्टी

गेल्या अनेक वर्षांपासून विनापरवाना राजरोसपणे सुरू असलेल्या खडकतच्या कत्तलखान्यावर पोलीस अधिक्षक विशेष पथक, स्थानिक गुन्हे शाखा, स्थानिक पोलिस, यांनी कारवाई केली.मध्यंतरी काही कत्तलखाने जमीनदोस्त केली.तरी देखील खडकतच्या कत्तलखान्यात गोवंशीय प्राण्याची कत्तल होऊन त्या गोमांसाचे कनेक्शन हैदराबाद असल्याचे नुकतेच अहमदनगर जिल्ह्यातील मिरजगाव पोलिसांनी केलेल्या कारवाईतून समोर आले आहे.

आष्टी तालुक्यातील खडकत येथे गेल्या अनेक वर्षांपासून विनापरवाना बेकायदेशीररित्या चालणारे अनेक कत्तलखाने आहेत.या कत्तलखान्यावर पोलिसांनी देखील अनेक वेळा कारवाय केल्या आहेत.तरी देखील कत्तलखाने सुरूच असल्याने ९ मार्च रोजी पाच कत्तलखाने महसुल, पोलिस व पंचायत विभागातील अधिकारी,कर्मचाऱ्याच्या समोर जेसीबीने जमीनदोस्त करण्यात आली होती.पण उर्वरित कत्तलखाने काही अडचणी अभावी तशीच राहिली होती.कत्तलखाने उध्वस्त केल्याने कत्तली थांबतील असे वाटत होते.पण १६ एप्रिल रोजी अहमदनगर जिल्ह्यातील मिरजगाव पोलिसांनी खडकत येथील कत्तलखान्यातून आलेले आठ टन गोमांस व आयशर टेम्पो,पिकअपसह पाच दुचाकी ताब्यात घेऊन ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करत २१ लाख ५१ हजारांचा मुद्देमाल जप्त केला होती.यातील जप्त गोमांस नष्ट करण्यात आले आहे. या वरून पुन्हा एकदा कत्तलखाना सुरू असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे कत्तल खडकतला करून गोमांसाचा साठा अहमदनगर जिल्ह्यात करत तिथून आयशर टेम्पोच्या माध्यमातून हैदराबाद येथे विक्रीसाठी पाठवले जात असल्याचे समोर आले आहे. खडकत येथील उर्वरित कत्तलखाने त्वरित पाडण्यात यावेत व जे कत्तलखाने पाडणे शक्य नाही तिथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत नसता आष्टी तहसीलवर गोरक्षक मोठ्या संख्येने सहभागी होऊन मोर्चा काढतील असे गोरक्षक शिवशंकर स्वामी यांनी सांगितले.

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या तारणहार पंकजाताई मुंडेच-शंकर देशमुख

प्रतिनिधी । बीड

जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या तारणहार पंकजाताई मुंडेच असू शकतात कारण त्यांच्या महाराष्ट्रातील ग्रामविकासमंत्रीपदाच्या कार्यकाळामध्ये बीड जिल्ह्याच्या शेतकऱ्यांना कधी नव्हे एवढा पिक विमा व दुष्काळी अनुदान अतिवृष्टी अनुदान अनेक प्रकारच्या अनुदान हे मिळाले आहेत आणि जर पंकजाताई मुंडे खासदार झाल्यानंतर शेतकऱ्यांना चांगले दिवस येतील किंवा शेतकऱ्यांना अनेक प्रकारचा फायदा पंकजाताई मुंडे केंद्रातून मिळून देऊ शकतात असा विश्वास भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस श्री शंकर देशमुख यांनी व्यक्त केला

पंकजाताई मुंडे या ग्रामीण भागातून येत असून त्यांना गोरगरिबांच्या दिनदलित शेतमजूर शेतकऱ्यांच्या प्रश्नांची माहिती आहे आणि त्यांनी ग्रामविकास मंत्री असताना गावाचा सर्वांगीण विकास कसा केला जाऊ शकतो गावांच्या समस्या काय आहेत गावांना शहरांमध्ये रूपांतरित करण्यासाठी काय आवश्यक आहे त्याचप्रमाणे जलसंधारण खात असताना गावाला पाणीदार कसे बनवले जाते गावाच्या पाण्याचे समस्या कशी दूर केली जाऊ शकते पाणी आडवा पाणी जिरवा हे फक्त नाव नावापुरतेच न करता त्यांनी प्रत्यक्षात महाराष्ट्र मध्ये करून दाखवले आहे. अशा अनुभवी सर्वांगीण विकासाची माहिती असणाऱ्या पंकजाताई मुंडे या बीड जिल्ह्याचा विकास करण्यासाठी सक्षम उमेदवार आहेत देशात पंतप्रधान श्री नरेंद्र मोदींजीच्या नेतृत्वाखाली सरकार केंद्रात येणारच आहे त्यावेळी पंकजाताई मुंडेंच्या माध्यमातून बीड जिल्हा विकासाचे नवे उच्चांक करेल

माजलगाव येथे मुंदडा परिवाराच्या निवासस्थानी भेट दिली असता खासदार डॉक्टर प्रीतम ताई मुंडे यांचा सत्कार करताना दयालसेठ लक्ष्मीनारायण मुंदडा सहपरिवार.

धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानकडून छत्रपती शिवाजी महाराज चौकाची पाहणी

प्रतिनिधी । किल्ले धारूर

किल्ले धारूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभा करण्याकरिता धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानकडून छत्रपती शिवाजी महाराज चौकाची पाहणी करण्यात आली आहे. किल्ले धारूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य दिव्य पुतळा उभा राहावा अशी किल्ले धारूर तालुक्यातील नागरिकांची मागणी आहे मात्र शासनाच्या जाचक अटीमुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभा करण्यास अडचण येत आहे धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठान

संभाजीनगरचे सर्व संस्थापक समिती सदस्य संपूर्ण टीमसह किल्ले येथे छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाची पाहणी करणे त्याविषयी चर्चा करण्यासाठी संघटनेची ध्येयधोरण सांगण्यासाठी आले होते यावेळी शौर्य प्रतिष्ठानच्या सदस्याकडून सर्व पाहणी केली असता व धारूर शहरातील नागरिकांशी संवाद करून छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभा करण्याकरिता सर्वतोपरी प्रयत्न करू असा शब्द धारुर वासियांना त्यांनी दिला यावेळी सुरेश फावडे , बालासाहेब जाधव, अतुल शिनगारे, पंजाब शिनगारे, ईश्वर खामकर, रोहित फावडे, शाम फावडे अक्षय गैबि सह शहरातील शिवप्रेमी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जाती पाती च नाही तर विकासाच राजकारण करणाऱ्या वंचित बहुजन आघाडीला निवडून द्या – अशोक हिंगे

प्रतिनिधी । बीड

जाती पाती च नाही तर विकासा च राजकारण करणाऱ्या वंचित सोशिताच्या कमी येणाऱ्या वंचित बहुजन आघाडीला निवडून द्या असे आव्हान वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी केले ते वडवणी नेकनूर प्रचार सभेत बोलत होते महाराष्ट्र मध्ये सर्वत्र जातीपातीच्या राजकारण चालू आहे विकासाच्या मुद्द्यावर कोणीही बोलत नाही मागे मोठ्या प्रमाणात वाढले आहे हे मुद्दे सोडून जातीपातीचा राजकारण करून पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न माहिती महाविकास आघाडी कडून केला जात आहे मात्र डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे वंशज असलेले प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी सतत वंचित शोषितांच्या प्रश्नावर काम करत आले आहे देशातील मोदी सरकारने एकीकडे महागाई वाढवली आहे त्यामुळे गोरगरीब जनतेचे जीवन जगणे मुश्किल झाले आहे कांद्यावर निर्यात बंदी घालून शेतकऱ्याला

VBA BEED MEDIA Apr 21, 2024, 12:30

अडचणी टाकल्या गेली अनेक वर्षापासून बीड जिल्ह्यातील रेल्वे चा प्रश्न पडला आहे जिल्ह्यातील तरुणांना नोकऱ्या नाहीत हे काम आतापर्यंतच्या खासदाराने का केले नाही असा प्रश्न उपस्थित करत माहायुती, महाविकास आघाडी हे फक्त जातीचे राजकारण करतात असे सांगत विकासाचे राजकारण करणाऱ्या वंचित बहुजन आघाडीला निवडून द्या आसे आव्हान वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी केले आहे वडवणी व नेकनुर येथे मतदारातून अशोक हिंगे यांचे जोरदार स्वागत करण्यात आलेवंचित बहुजन आघाडीचे लोकसभा उमेदवार अशोक हिंगे पाटील यांचा आज नेकनुर येथे संपर्क दौरा यावेळी त्यांचे स्वागत व सत्कार केले. यामध्ये भीमराव पायाळ हर्षवर्धन गडशिंगे अशोक विद्याधर युवराज पायाळ धनराज पायाळ मनोज पायाळ स्वप्निल पवार रोशन दिवार अतुल धनवे लक्ष्मण रोशन धनवे यांच्यासह पंचकोशीतील मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते

तलवाडा पोलिसात हाप्ते व लाचखोरीची वृती फोपावली

एकास लाचलुपत विभागाने लाच सविकारतांना रंगेहाथ पकडले

प्रतिनिधी । गेवराई

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलिस प्रशासनातील कर्मचा-यांच्या बाबतीत सातत्याने चर्चा ऐकन्यास मिळतात की तलवाडा पोलिसात हाप्ते व लाचख़ोरीची वृती फोपावली! याचा प्रतय काल जातेगाव येथे प्रतेक्षात दिसुन आला.

जातेगाव येथे घरगुती वाद झाला होता. त्या वादातील केस भांगडी टाळुन तो वाद मिटवण्यासाठी पंधरा हजाराची लाचेची मागणी करण्यात आली होती . रक्कम न दिल्यास मोठ्या गुन्ह्यात तुला गुतवण्यात येईल अशी धमकी वजा संबंधित बिट अमलदाराने दिल्यामुळे व पैशाची पूर्तता करू न शकल्याने संबंधिताने लाच लुचपत विभागाकडे सहाय्यता मागितली होती. त्या आणुषंगाने दि. २१ रोजी जातेगाव या ठिकाणी दहा हजाराची लाच घेताना बीट अमलदार पैलवान हरिभाऊ बांगरला सबंधित विभागाने रंगेहाथ पकडून त्याची लाचेच्या मैदानात पाठ लोळवली आसल्याचे नागरिकात बोलले जाऊ लागले आहे. याबाबत समजलेली माहिती अशी की जातेगाव येथे दोन कुटुंबात वाद झालेला होता आणि या वादातून संबंधितांने तलवाडा पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती याप्रकरणी या दिलेल्या तक्रारीतून आरोपीला हा झालेला वाद मिटवण्यासाठी जातेगाव बीट अंमलदार पोलीस पैलवान हरिभाऊ बांगरणे पंधरा हजार लाचेची मागणी केली होती याप्रकरणी संबंधित आरोपीला पैसे देण्याची इच्छा नसल्याने बीड या ठिकाणी सबंधित विभागाकडे सहाय्यता मागितली होती. संबंधित विभागाने याची शहनिशा करून रविवार २१ रोजी यमादेवी मंदिर परिसरात बीट अंमलदार हरिभाऊ बांगर याला संबंधित दिलेल्या तक्रारीतील वाद मिटवण्यासाठी लाच म्हणून दहा हजार स्विकारतांना लाच लुचपत विभागाने रंगेहात पकडले असून संबंधित बिट अमलदाराबरोबर त्याचा रायटर ही होता आशी चर्चा आहे. परंतु माशी कुठे शिकली माहित नाही.

गुण्ह्यातील वाद मिटवण्यासाठी बीट अंमलदार पैलवान हरिभाऊ बांगर याला दहा हजाराची लाच घेताना लाच लुचपत विभागाने रंगेहात पकडले असून याप्रकरणी तलवाडा पोलीस स्टेशनला कसल्याच प्रकारची माहिती नव्हती . या प्रकरणी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता आतापर्यंत तालुका पोलीस स्टेशनला आहे कसल्याच प्रकारचा लाच लुचपत विभागाने तक्रार वा गुन्हा दाखल केला नसल्याची माहिती पोलीस विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सांगितले होते. परंतु बीड लाचलुचपत विभागाशी संपर्क केला असता

या प्रकरणी तिघांविरुद्ध तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आसल्याची माहिती रात्री ऊशीरा उपलब्ध झाली. सदरील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक संदीप आटोळे, अप्पर अधीक्षक मुकुंद आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक सापळा अधिकारी पो. नि. युनूस शेख, पथकातील श्रीराम गिराम, अमोल खरसाडे, अविनाश गवळी, भरत गारदे, अंबादास पुरी, हनुमान गोरे, सुरेश सांगळे, संतोष राठोड, स्नेहलकुमार कोरडे यांनी केली.

ॲड.प्रकाश आंबेडकर, रेखाताई ठाकूर यांच्या उपस्थितीत २५ रोजी

उमेदवारी अर्ज भरणार – अशोक हिंगे

प्रतिनिधी । बीड

वंचित बहुजन आघाडी ने प्रचाराचा पहिला टप्पा पूर्ण केला आहे बीड, गेवराई, माजलगाव, परळी,अंबेजोगाई,केज,आष्टी, पाटोदा शिरूर आदी ठिकाणी मतदाराच्या भेटी घेतल्या ठिकठिकाणी उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असून नको महायुती नको महाविकास आघाडी आता हवी वंचिताची वंचित बहुजन आघाडी असे मतदार बोलून दाखवत आहेत त्यामुळे लोकसभा निवडणुकी मीच विजय होणार हे मात्र निश्चित आहे.मोठे शक्ती प्रदर्शन करत आपण

गुरुवार दिनांक २५ एप्रिल २०२४ रोजी अँड. प्रकाश आंबेडकर, रेखाताई ठाकूर ,राज्य प्रवक्ते फारूक अहमद,राज्य उपाध्यक्ष प्रा किसन चव्हाण, प्रा.विष्णु जाधव ,अरून आबा जाधव व सर्व जिल्हा पदाधिकारी यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल करणार आहोत अशी माहिती अशोक हिंगे यांनी सांगितली .

पुढे बोलताना हिंगे म्हणाले की महाराष्ट्र सरकारने व केंद्रातील सरकारने जनते ला महागाई च्या खाईत लोटले आहे तर आरक्षणाच्या नावाखाली सर्वच समजला झुलवत ठेवण्याचे काम केले आहे महायुती, महाविकास आघाडी हे दोन्ही एकाच नाण्याच्या बाजू आहेत म्हणून जनतेने यांना सत्ते पासून दूर ठेवण्याचा निश्चिय केला आहे व वंचित

बहुजन आघाडीला पाठींबा मिळत आहे त्यामुळे माझा विजय निश्चित असल्याचे अशोक हिंगे यांनी सांगितले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून पायी रॅलीने दिं २५/४/२०२४ रोजी उमेदवारी अर्ज दाखल करून समारोप पारस नगरी शासकीय विश्रामगृहाच्या मागे होईल तरी मतदार बंधु भिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन आशीर्वाद द्यावेत अशी विंनती अशोक हिंगे यांनी केली आहे.

आज जामखेड येथील श्री राम मंगल कार्यालय येथे शिरूर तालुक्याचे सह संघटक राजेश जी कोकणे यांच्या मुलीच्या विवाह सोहळ्यास शिवसेना जिल्हाप्रमूख परमेश्वर सातपुते सर यांनी उपस्थित राहुन नववधूवरास पुढील वैवाहिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी वडवणी चे भारत दादा जगताप, उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर,पाटोदा तालुकाप्रमुख मुकूंद शिंदे, शिरूर तालुकाप्रमुख सोपान काका मोरे,सुभाष जी क्षीरसागर,अजय गायकवाड आदी उपस्थित होते..!!

योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या नुतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड

चंद्रशेखर बर्दापुरकर अध्यक्ष तर कमलाकर चौसाळकर नवे सचिव

प्रतिनिधी । अंबाजोगाई

महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी अग्रेसर असलेल्या योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी, ख्यातनाम अभियंता श्री. चंद्रशेखर बर्दापुरकर यांची तर सचिवपदी कमलाकर चौसाळकर यांची बहुमताने निवड करण्यात आली असून उर्वरीत कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी जी.बी. व्यास,कार्यकारी उपाध्यक्ष

ड.जगदीश चौसाळकर, कोषाध्यक्षपदी डॉ. शैलेश वैद्य आदींची बिनविरोध निवड करण्यात आली असून संचालक म्हणून एन. के.गोळेगांवकर,एम.एस. लोमटे,भीमाशंकर शेट्ये, लंकेश वैद्य,आर.व्ही.

सोनवळकर,अंगद कराड,प्रताप पवार, अभिजित लोहिया, सय्यद पाशुमियाँ,प्रा. जयश्री देशपांडे,ड. कल्याणी विर्धे आदींची निवड करण्यात आली आहे.

पुणे – हुबळी येथील कु. नेहा हिरेमठ हत्या प्रकरणी आरोपीस त्वरित फाशी द्यावी असे निवेदन संस्थेच्या वतीने मा. जिल्हाधिकारी साहेबांना आज देण्यात आले. यावेळी राष्ट्रीय जंगम संघटना, वीरशैव माहेश्वर मंडळ, पुणे जिल्हा

निपाणी जवळका येथे दोन दिवस भव्य ज्योतिबा यात्रा उत्सव

गेवराई (वार्ताहर) श्रीक्षेत्र ज्योतिबा देवस्थान निपाणी जवळका येथील यात्रा दि.२३ व दि.२४ वार मंगळवार व बुधवार या दोन दिवसात भव्य दिव्य अशी यात्रा भरणार आहे, अशी माहिती श्रीक्षेत्र ज्योतिबा संस्थान ट्रस्टचे विश्वस्त श्री अण्णासाहेब लोणकर यांनी दिली.

दरम्यान गेल्या वर्षीच्या मोठ्या प्रमाणावर आलेल्या देणगीमुळे मंदिराचे व परिसरातील भव्य दिव्य असे बांधकाम पूर्ण झालेले आहे. दरवर्षीप्रमाणे रितीरिवाजानुसार गंगेवरून पाणी आणून पहाटे पहाटेच देवतेस शाही स्नान, पहिल्या दिवशी बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम, भव्य दिव्य छबीना मिरवणूक,. दुसऱ्या दिवशी महाराष्ट्रातील नामांकित कुस्तीपटूंचा कुस्तीचा फड असे सर्व कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. तसेच श्रीक्षेत्र ज्योतिबा

ज्योतिबाच्या नावानं चांगभलं

मंदिर जीर्णोद्धाराचा मोठा व्यापक कार्यक्रम हाती घेतलेला आहे. यासाठी गावातील सर्व तरुण मंडळ यांनी बैठक घेतली व यात्रेच्या ठिकाणी उन्हामधून आलेल्या यात्रेकरूसाठी मागील वर्षी एक हजार जार च्या पाण्या चे नियोजन केले होते

पाडळसिंगीत अखंड हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता

ह.भ.प.रामराव महाराज ढोक यांचे काल्याचे कीर्तन ; हाजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप

प्रतिनिधी । गेवराई

गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथे श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहाची शनिवार दि.२० एप्रिल रोजी एकलिंगेश्वर महादेव मंदिराच्या प्रांगणात सुप्रसिद्ध रामायणाचार्य ह.भ.प. गुरुवर्य रामराव महाराज ढोक, नागपूरकर यांच्या अमृततुल्य काल्याच्या कीर्तनाने उत्साहात सांगता झाली. यावेळी पंचक्रोशीतील संत - महंत, विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी तसेच महिला व पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

ॐ ज्ञानेश अध्यात्म गीता मंडळ, समस्त गावकरी व एकलिंगेश्वर मित्रमंडळ पाडळसिंगी यांच्या वतीने गेल्या ७४ वर्षांपासून श्रीमद् भागवत कथा व ४२ वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी श्री.ह.भ.प. महेश महाराज महाजन यांच्या सुमधूर वाणीतून भागवत कथा उत्साहात संपन्न झाली. तर सप्ताहात सात दिवस महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकारांची कीर्तन सेवा दिली. तर शनिवार दि.२० एप्रिल रोजी सुप्रसिद्ध रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांचे दुपारी १२ ते २ यावेळेत अमृततुल्य काल्याचे किर्तन संपन्न झाले यानंतर उपस्थित हाजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. संध्याकाळी ९ ते ११ पालखी मिरवणुक तसेच एकलिंगेश्वर भजनी मंडळ व महिला भजनी मंडळ, पाडळसिंगीकर यांचा हरिजागर झाला. दरम्यान श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताहामुळे गावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. सप्ताहात संत- महंत, सामाजिक शैक्षणिक, राजकीय, पत्रकारिता तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होते. सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी पाडळसिंगी ग्रामस्थांच्या वतीने विशेष परिश्रम घेण्यात आले.

भक्ताच्या नवसाला पावणारे पिंपरीचे ग्रामदैवत हनुमान यात्रोत्सव ;दोन दिवस चालतो यात्रोत्सव

नवसपुर्तीसाठी महिला घालतात दंडवत

प्रतिनिधी । आष्टी

ग्रामदैवत असलेल्या आणि रामदास स्वामी यांनी प्राणप्रतिष्ठा केलेल्या आष्टी तालुक्यातील पिंपरी घाटा येथील हनुमान मंदिरातील यात्रोत्सवला गेल्या अनेक वर्षांची परंपरा असून मनोभावे गुण्यागोंविदाने येथे यात्रोत्सव साजरा केला जात असून भक्ताच्या नवसाला पावणारे जागृत देवस्थान म्हणून हनुमान देवस्थानाची ओळख आहे. हनुमान जयंतीच्या दिवशी भव्यदिव्य कुस्ती आखाडा भरवला जात असल्याची माहिती यात्रोत्सव कमिटीने दिली आहे.

आष्टी तालुक्यातील पिंपरी घाटा येथे रामदास स्वामी यांनी हनुमान मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली आहे. ग्रामदैवत असलेल्या हनुमानाच्या यात्रेला त्यानंतर सुरुवात झाली. बोललेले नवस पूर्ती होणारे देवस्थान म्हणून याची सर्वत्र ख्याती आहे. हनुमान जयंतीच्या दिवशी येथे भरणारा यात्रोत्सवाला अनेक वर्षाची परंपर असुन या यात्रोत्सवला बाहेरगावी

उद्योग धंद्या निमित्त व पोटापाण्यासाठी गेलेले नागरिक, सासरी गेलेल्या सासुरवासिनी मुलांबाळा समवेत आवर्जून न चुकता हजेरी लावतात. मिठाई,खेळणीची दुकानांनी आनंदाचे वातावरण निर्माण होत असते.

नवसपूर्तीसाठी महिला घालतात दंडवत

महाराष्ट्रात एकमेव असे देवस्थान येथे आहे जिथे महिला मुलांबाळासह इतर बोललेले नवस पूर्ण झाल्याने रांगेत दंडवत घेऊन पूर्तता केली जात असते..

पैठण,नागतळा येथुन आणले जाते गंगाजल

पैठण, नागतळा येथुन गावातील तरूण पायी पवित्र गंगाजल आणतात.जयंतीच्या एक दिवस अगोदर छबीना मिरवणुकीत कावडीच्या माध्यमातून आणलेले गंगाजल ची मिरवणूक करून हनुमंत जयंतीच्या दिवशी पहाटे पवित्र गंगाजलाने स्नान घातले जाते.

नामवंत मल्लाची कुस्ती आखाड्यात हजेरी

हनुमान जयंतीच्या दिवशी दरवर्षी प्रमाणे याठिकाणी जंगी कुस्ती आखाडा भरला जातो या आखाड्यात पुणे,नगर,बीड,करमाळा,मगरास लिंमगाव,यासह विविध ठिकाणांहून नामवंत मल्ल कुस्ती आखाड्यात आवर्जून हजेरी लावतात. इनामही तोला मालाचे दिले जात असून चितपट कुस्ती पाहण्यासाठी कुस्ती शौकीन मोठी गर्दी करतात.

परीक्षेमध्ये सक्सेस क्लासेस ची कु.अनुष्का निलेश बडे जिल्ह्यातून प्रथम !

प्रतिनिधी । शिरूर कासार

छ्वचड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या मध्ये छ्ढ-ऊ प्रवर्गातून संपूर्ण बीड जिल्ह्यातून कु. अनुष्का निलेश बडे प्रथम क्रमांकाने गुणवत्ता यादीमध्ये आली. अनुष्का ही कालिकादेवी महाविद्यालयात इयत्ता ८ वी च्या वर्गात शिक्षण घेत होती, तिने या छ्वचड परीक्षेची तयारी सक्सेस कोचिंग क्लासेस मध्ये केली. सक्सेस क्लासेस चे संचालक अमोल

सव्वासे यांनी खूप साऱ्या स्पर्धा परीक्षांचा सखोल अभ्यास असल्याने त्यांनी छ्वचड परीक्षेत या वर्षी २८ पैकी १५ विद्यार्थी पास केले, त्यापैकी ओम मुळे आणि अनुष्का बडे गुणवत्ता यादीमध्ये आले. तसेच सारथी मध्ये पण काही विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे.

अमोल सव्वासे हे ग्रामीण भागातील मुलांसाठी जवळपास १३ वर्षांपासून ज्ञानदानाचे काम करत आहे. त्यांच्या क्लासेस मध्ये अनाथ, आर्थिक बाजू कमकुवत असणाऱ्या विद्यार्थ्यांना निःशुल्क अध्यापन करत आहेत. त्यांच्या विद्यार्थ्यांनी आजपर्यंत आजपर्यंत स्कॉलरशिप मध्ये बीड जिल्ह्यात प्रथम, चजच् स्पर्धेत बीड जिल्ह्यात प्रथम, चढ्ढ परीक्षा किंवा इतर स्पर्धा परीक्षा मध्ये उत्तीर्ण झाले आहेत.

शालेय जीवनापासून च सव्वासे सर विद्यार्थ्यांना णझडउ चझडउ या स्पर्धा परीक्षा बद्दल मार्गदर्शन करत आहेत. आत्तापासूनच जर स्पर्धा परीक्षेची विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण केली तर विद्यार्थी भविष्यात खूप मोठ्या पदावर अधिकारी होतील असे सव्वासे यांनी सांगितले.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ क्लासेस मध्ये संपन्न झाला, त्यावेळी सव्वासे , येवले, मंडलिक , श्रीमती सूर्यवंशी तसेच विद्यार्थी व पालक मोठ्या संखेने उपस्थित होते.

रस्त्याची मागणी पुर्ण झाली ,नायब तहसिदाराने समजूत काढली !

नारायणवाडी करांचा मतदानावरचा बहिष्कार मागे !

शिरूर कासार । प्रतिनिधी

तालुक्यातील नारायणवाडी ग्रामस्थांनी विधान सभेच्या व ग्रामपंचायतच्या निवडणूकिवर गावचा रस्ता झाल्याशिवाय मतदान न करण्याचा निर्णय घेऊन बहिष्कार टाकला होता . लोकसभेच्या निवडणुकिपुर्वीच ग्रामस्थाच्या मागणीनुसार रस्त्याचे काम झाले होते मात्र बहिष्कार मागे घेतल्याचे रितसर पत्र प्रशासनाकडे

नसल्याने ना.त.शिवनाथ खेडकर यांनी नारायणवाडीत जाऊन एस व्ही इ इ कार्यक्रमाअंतर्गत जनजागृती व समोपदेशन करून ग्रामस्थां कडून मतदानावरील बहिष्कार मागे घेत असल्याचा प्रतिसाद देत निर्णय लिखीत स्वरूपात दिल्याने मतदानातील अडथळा आता दूर झाला असल्याचे ना.त.शिवनाथ खेडकर यांनी सांगितले .यावेळी तलाठी व ग्रामस्थ उपस्थित होते.

गरिबांनी इंग्रजी शाळेत शिक्षण घेऊच नये

शिक्षण विभागाची अघोषित सक्ती- फयाज शेख

प्रतिनिधी । शिरूर कासार

शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) प्रवेश प्रक्रियेतील अर्ज नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. पालकांना अर्ज भरण्यासाठी ३० एप्रिलपर्यंतची मुदत आहे. राज्य सरकारने आरटीई प्रवेश प्रक्रियेत बदल केल्याने घरापासून १ते३ किलोमिटर पर्यंत शासकीय,अनुदानित, विनाअनुदानित शाळा असेल तर इंग्रजी शाळेत प्रवेश मिळणार नाही. या निर्णयामुळे गरिबांनी इंग्रजी शाळेत शिक्षण घेऊच नये अशी अघोषित सक्तीच शिक्षण विभागाने केली आहे. पालकांमध्ये याचा जाहीर निषेध व्यक्त होत आहे असे फयाजभाई शेख यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे म्हटले आहे.आरटीईअंतर्गत वंचित, दुर्बल, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास घटकांतील विद्यार्थ्यांना २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश दिले जातात. शालेय शिक्षण विभागाने यंदा आरटीई प्रवेश प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल केला आहे. त्यानुसार विद्यार्थ्याच्या निवासस्थानापासून एक किलोमीटरपर्यंतच्या अनुदानित शाळा, शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेत प्रवेश देण्यात येणार आहे. यातील उपलब्ध शाळा नसल्यासच स्वयंअर्थसहाय्यित खासगी शाळेत प्रवेश दिला जाणार आहे. शाळा निवडताना पालकांना अनुदानित शाळा, शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा आणि त्यानंतर स्वयंअर्थसहाय्यित शाळा या प्राधान्यक्रमानुसार प्रवेश दिला जाणार आहे. सदरील अंतरात जि.प. व अनुदानित शाळा उपलब्ध आहेत या शाळेचा शिक्षणाचा दर्जा सर्वांना माहीत आहे. पालकांना इंग्रजी शाळेत पाल्याला शिकवायचे असेल तर पैसे

भरून शिकवा नाही तर सरकारी मराठी शाळेत मोफत शिकवा असा सज्जड दम व सक्ती शिक्षण विभागाने केल्याचे या निर्णयातून दिसुन येत आहे. यामुळे गरिबांना शिक्षणा पासुन वंचित ठेवण्याचा कुटील डाव आणि शाळेचे खाजगीकरण करून शिक्षण महाग करण्याचे षडयंत्र दिसत आहे. याचा जाहीर निषेध करतो पालकांच्या वतीने मोठे आंदोलन उभा करणार असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते फयाज शेख यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

खालापूरी येथे शुक्रवारी दिडशे वर्षाची परंपरा असलेला अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ !

सावरगांवात दोन दिवसापासून १३२ वा सप्ताह सुरू आहे !

प्रतिनिधी । शिरूर कासार

तालुक्यातील खालापुरी या गावांमध्ये गेली दीडशे वर्षांपासूनची परंपरा असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात शुक्रवारी झाली आहे . तर सावरगावांत दोन दिवसापासून १३२ वा सप्ताह सुरू आहे . हनुमान जयंती निमित्त हा अखंड हरिनाम सप्ताह नगद नारायण महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने तसेच वै. महादेव महाराज यांच्या आशीर्वादाने , मठाधिपती शिवाजी महाराज यांच्या शुभहस्ते व भक्त दास महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली या सप्ताहाची शुक्रवार पासून फुले

टाकून प्रारंभ झाला आहे सप्ताह कालावधीमध्ये ज्ञानेश्वरी पारायण, राम कथा, हरिपाठ ,काकडा, भजन, विष्णू सहस्रनाम, हरिपाठ ,संगीत भजन, हरी किर्तन होणार आहेत. राजेंद्र महाराज वाघमारे ,श्रीरंग महाराज डोंगरे, निवृत्ती महाराज रामदास, ज्ञानेश्वर महाराज शास्त्री, भगवंत महाराज पुजारी, नाना महाराज कदम, त्रिवेंद्रानंदजी सरस्वती महाराज, आदींची कीर्तन रूपी सेवा होणार असून दिनांक २६ रोजी भक्तीदास महाराज शिंदे यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे तरी भाविक भक्तांनी या सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थांनी केले आहे

सावरगावात १३२ वा सप्ताह !

परंपरेची शंभरी ओलांडलेल्या खालापुरी पाठोपाठ सावरगांव च.येथेही दोन दिवसापासुन १३२ वा सप्ताह सुरू झाला असुन या सप्ताहाचा प्रारंभ वै.बंकटस्वामी यांनी केला होता ,पुढे वै.गणपत भाऊ , वै.भगवान बाबा ,वै.वामनभाऊ वै.भिमसिह महाराज ,वै.प्रल्हाद तात्या या दिग्गज संताची उपस्थिती लाभलेला हा परंपरेचा सप्ताह आजही भगवान गडाचे महंत डॉ न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांचे मार्गदर्शनाखाली खेडकर परिवार सांभाळत आहे .गुरूवारी रात्री कृष्णा महाराज शास्त्री निरंजन संस्थान एकनाथवाडी यांचे किर्तन संपन्न झाले.

पंचशील नगर बीड येथे नृत्य स्पर्धा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी । बीड

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर १३३ वी सार्वजनिक जयंती उत्सव समिती पंचशील नगर बीड तर्फे आयोजित पंचशील महोत्सवात दिनांक २१/ ४ /२०२४ रोजी त्रिरत्न बुद्ध विहार येथे स्पर्धेचे आयोजन केले होते या स्पर्धेसाठी पंचशील नगर व आजूबाजूच्या परिसरातील अनेक स्पर्धकांनी विविध विविध गाण्यावर नृत्य करून आपली कला सादर करत असताना प्रेक्षकांना आनंदित केले या कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणून ॲड अविनाश गडगे सर व कुमारी तनुष्का अविनाश गडगे यांची उपस्थिती लाभली होती या कार्यक्रमांमध्ये

परीक्षकांनी नृत्य करणाऱ्या स्पर्धकांचे निरीक्षण करून त्यांना ड्रेसिंग एक्सप्रेशन व नृत्य सादर करत असताना विविध कला गुणांचा अभ्यास करून योग्य ते गुण देऊन प्रथम द्वितीय तृतीय असे क्रमांक काढलेले आहेत हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सारंग जावळे , राजू मस्के यानी मेहनत घेतली त्यांना अध्यक्ष ॲड तेजस वडमारे सचिव चेतन पवार उपाध्यक्ष आकाश कसबे संकेत साबळे सहसचिव आदेश मगर कोषाध्यक्ष अभय गायसमुद्रे कार्याध्यक्ष बाळासाहेब काकडे यांनी सहकार्य केले, या कार्यक्रमासाठी सर्व समाजबांधव,बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका व पंचशील नगर मित्र मंडळातील सर्व सदस्य हजर होते.

सौ.मनीषा पैठणकर तुलसीरत्न पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी । बीड

येथील देवगिरी प्रतिष्ठान बीड संचलित तुलसी शैक्षणीक समुह बीड यांच्या वतीने दि.२० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता तुलसी इंग्लिश स्कुल बीड येथे तुलसीरत्न पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तुलसी इंग्लिश स्कूलच्या शिक्षिका सौ.मनीषा पैठणकर तुलसीरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी देवगिरी प्रतिष्ठान बीडचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे, तुलसी शैक्षणिक समूहाच्या प्रेरणास्थान तुळसाबाई रोडे, कॅनरा बँक बीड शाखा

व्यवस्थापक सतिष कुमार, निवृत्त, डिवायएसपी.सी.आर. रोडे, निवृत्त शिक्षणाधिकारी माऊली सोनवणे, श्रावस्ती शि.प्र. व बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अध्यक्ष जालना बाळासाहेब दांडगे, आर.डी.जोगदंड, प्रा.राम गायकवाड, तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय प्राचार्य डॉ. एल.एम.थोरात, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन प्राचार्य डॉ.अशोक धुलधुले, तुलसी इंग्लिश स्कुल बीड प्राचार्य उमा जगतकर, नालंदा कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन प्राचार्य डॉ.शैलेजा पैकेकर, मॉडर्न संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर प्राचार्य ज्योती मोरे, प्रशासकीय अधिकारी डॉ.अस्मिता साळवे यांची उपस्थिती होती. तुलसी शैक्षणिक समूहाच्या प्रेरणास्थान तुळसाबाई रोडे हस्ते सौ.मनीषा पैठणकर सन्मानित करण्यात आले.या पुरस्काराचे स्वरुप स्मृती चिन्ह, २५ हजार रुपयांचा धनादेश असे होते. तसेच संस्थेमधील कर्मचारी संतोष प्रधान, ज्योती मोरे यांना ५० हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. यावेळी तुलसी शैक्षणिक समूहातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

लोकसभेच्या निवडणुकीत दिग्गज नेत्यांची प्रतिष्ठा पणाला

ग्रामीण भागात तुतारी वाजणार की कमळ फुलणार ; चौंका चौंकात रंगू लागल्या गप्पा

प्रतिनिधी । गेवराई

लोकसभा निवडणुकीचे वारे जिल्ह्यात वेगाने वाहू लागले आसून उष्मघाता प्रमाणे राजकीय वातावरण ही चांगलेच तापले असल्याचे दिसून येत आहे,उमेदवार आणि नेते मंडळी पदाधिकारी,कार्यकर्ते,मतदार आणि जनतेच्या गाठीभेटी साठी तालुक्यातील गावागावात भेटी देवून मतदान करण्याचे आवाहन करत आहेत.मागील पाच वर्षाचा पाढा मतदारा समोर मांडून येणाऱ्या काळात काय करता येईल याचे गणित मांडून लोकसभेच्या निवडणुकीत संधी द्यावी अशी मागणी करताना दिसतात यामध्ये तालुक्या तालुक्यातील नेत्यांची प्रतिष्ठा मात्र पणाला लागली असून त्यांना आपली ताकत दाखवून देण्यासाठी मोर्चेबांधणी करावी लागत आहे. जनतेच्या अनेक प्रश्नांना समोर जावे लागत असून ग्रामीण भागात या लोकसभेमध्ये तुतारी वाजणार की कमळ फुलणार अशी चर्चा आता चौका चौकात रंगू लागल्याने निवडणुकीची रंगीत वाढत असून कोणाला विजयाचा गुलाल लागतो हे जनतेने दिलेल्या कौलावर अलंबून असणार आहे.

बीड जिल्हात यावेळेस लोकसभेची निवडणूक ही चांगलीच रंगतदार आणि चुरशी ची होणार असल्याचे दिसत असून महायुती कडून लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या कन्या पंकजाताई मुंडे या उमेदवार म्हणून जनतेसमोर जानार आहेत तर माविकास आघाडी करून शेतकरी पुत्र म्हणून ज्यांची ओळख असणारे बजरंग सोनवणे हे उमेदवार म्हणून आपले अस्तित्व दाखवणार आहेत. जिल्ह्यात होणारी ही लोकसभेची निवडणूक ही येणाऱ्या राजकीय घडमोची नांदी ठरणार आहे.महाराष्ट्रात झालेले राजकीय फेरबदल,खासदार,आमदार यांनी केलेले पक्ष प्रवेश, पक्षाची झालेली राजकीय फोडाफोडी आणि सध्याचा मराठा समाजाचा जिव्हाळ्याचा मराठा आरक्षण प्रश्नावर लोकसभेच्या निवडणुकीत काय घडामोडी करणार हे लोकसभेच्या निवडणुकीत दिसणार आहे.भाजप,शिंदे सेना ,आणि अजित दादाची राष्ट्रवादी तसेच काँग्रेस,शरद पवारांची राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरेंची शिवसेना या पक्षांना आपल्या पक्षाचे राजकीय अस्तित्व या लोकसभेत पणाला लागले असून आपला उमेदवार कसा निवडून आणता येईल यावर नेते आणि कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आहेत.मागील दहा वर्षात जिल्ह्याच्या खासदार असणाऱ्या प्रीतमताई मुंडे यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्न केले हे त्यांनी जरी सांगितले असले तरी मागील पाच वर्षात त्यांच्या खासदार फंडातून कोणतेच काम झाले नसल्याचे जिल्ह्यात समोर आले आहे त्यामुळे त्यांच्या बहिन पंकजाताई मुंडे यांना त्याचा मतदानात फटका बसेल हे ग्रहित धरुनच चालावे लागेल.तसेही जिल्ह्यात आज पर्यंत मुंडे भगिनींनी वडील गोपीनाथ मुंडे यांच्या नावानेच मते मागितली असून मतदारांनी ही लोकनेत्यांच्या कन्येला भरभरून प्रतिसाद देत मतदान केले आहे परंतु भाजप नेच त्यांना नकळत बाजूला सावरण्याचे काम मागील काळात केले हे त्यांनाही आणि जनतेलाही जाणवले.त्यावेळेस पंकजाताई निर्णय घेवून पक्ष सोडतील की काय अशी चर्चा जिल्ह्यात तसेच महाराष्ट्रात होती परंतु त्यांनी वेळोवेळी संयम राखून सावध भूमिका बजावली.आणि या लोकसभेत महायुती कडून त्यांना खासदार प्रीतमताई मुंडे यांना बाजूला करून लोकसभेची उमेदवारी जाहीर केली. या निवडणुकीत जिल्ह्यातील भाजप,शिंदेची शिवसेना आणि अजीप पवार यांच्या राष्ट्रवादी च्या नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली असून पंकजा ताईला निवडून आणण्यासाठी तालुक्यातील सर्वच ग्रामीण भागात पदाधिकारी आणि कार्यकर्ते कामाला लावले आहेत तर दुसरी कडे पंकजाताई च्या विरोधात महाविकास आघाडी कडून ज्योतीताई मेटे यांनी तिकीट भेटणार अशी जोरदार चर्चा असतांना शरद पवार गटात नव्यानेच प्रवेश करणारे पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे अत्यंत विश्वासू आणि कट्टर समर्थक बजरंग सोनवणे यांना लोकसभेची उमेदवारी जाहीर केली असल्याने ज्योटिताई मेटे यांच्या उमेदवारी चर्चेच्या विषयाला शरद पवार गटात पूर्णविराम मिळाला.त्यामुळे त्यांना वंचित कडून लोकसभा लढण्याची ऑफर देण्यात आली परंतु त्यांनी आपली भूमिका जाहीर केली नसल्याने अखेर अशोक हिंगे यांचे नाव वंचित कडून जाहीर करण्यात आले असल्याने आता मेटे ताई यांची भूमिका कोणती असेल हे येणाऱ्या काळात स्पट होईल. महाविकास आघाडी कडून लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात असलेले बजरंग सोनवणे यांनी मागच्या लोकसभेच्या निवडणुकीत ही चांगलीच मजल मारत जवळपास पाच ते साडेपाच लाख मत मिळवली होती शेतकरी पुत्र म्हणून जिल्ह्यात सहानुभिती मिळवत मतदार समोर जाऊन मते मागितली परंतु पराभव झाल्यावर परत ग्रामीण भागात त्यांनी संपर्क ठेवला नसल्याने आता परत त्यांना मतदार कितपत पसंती देतात हे या निवडणुकीत समोर येईल.कारण वेगवेगळे पक्ष,पक्षातील नेते आणि पदाधिकारी व कार्यकर्ते मागच्या निवडणुकीत एकमेकांच्या विरोधात जनतेसमोर आपली भूमिका मांडत होते तेच नेते आणि पदाधिकारी या लोकसभा निवडणुकीत आपल्या उमेदवारासाठी एका स्टेजवर येऊन जनतेच्या समोर येणार आहेत.

गेवराई विधानसभा निवडणुकीत माजी आमदार आमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार लक्ष्मण पवार हे परस्पर विरोधी होते विजयसिंह पंडित यांना आमदार करण्यासाठी अमरसिंह पंडित यांनी तालुका पिंजून काढून विधानसभा विजया जवळ आणून ठेवली होती तर लक्ष्मण पवार यांनी ही आपली प्रतिष्ठा पणाला लावली होती.परंतु या लोकसभेत अजित पवार गटात असणारे नेते अमरसिंह पंडित तर भाजप चे आमदार लक्ष्मण पवार यांना दोघांनी लोकसभेत पंकजाताई मुंडे यांचा प्रचार करावा लागणार असल्याने हे दोन्ही तालुक्याचे नेते एकाच स्टेजवर दिसणार का? जर असे झाले तर विधानसभा निवडणुकीत पंकजाताई मुंडे या विजयसिंह पंडित यांचा प्रचार करणार की लक्ष्मण पवार यांचा हा प्रश्न जनतेच्या चर्चचा विषय सद्या तालुक्यात आहे.तर उभाठा सेनेचे नेते बदामराव पंडित हे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या साठी तालुक्यात आपली मतदान रुपी ताकद दाखवतील...

मराठा समाजाची भूमिका निर्णायक ....

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी समाजासाठी रस्त्यावर उतरून मोठा संघर्ष उभा केला आहे.त्यांनी समाज प्रथम ही भूमिका मनात ठेवून समाजाला जोपर्यंत आरक्षण भेटत नाही तो पर्यंत शांत बसणार नसल्याचे शास ठणकावून सांगितले असल्याने मराठा समाज ही आक्रमक भूमिका घेत मनोज जरांगे पाटील यांच्या सोबत खंबीरपने उभा असून या लोकसभा निवडणुकीत ज्यांनी मराठा समजला सहकार्य केले साथ दिली त्यांनाच मदत करू असे सूचक वक्तव्य केल्याने या लोकसभा निवडणुकीत मराठा समाजाची भूमिका निर्णायक ठरणार हे निश्चित आहे.

जनतेच्या समस्या जैसे थे....

निवडणुका येतात आणि जातात परंतु जनतेच्या समस्या ह्या कायम समस्यांच राहतात कारण निवडणूक काळात दिलेली आश्वासने आणि शब्द हे निवडणुका झाल्या की उमेदवार आणि नेते विसरून जातात.त्यामुळे जनतेच्या मूलभूत प्रश्नांना बगल देण्यात येते.मतदारांचे प्रश्न आणि समस्या ह्या जैसे थे राहतात त्यामुळे जनतेने आशेने निवडून दिलेले खासदार आणि आमदार हे जनेतला निवडणुका झाल्या की विसरून जातात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

अपक्ष उमेदवारी अर्ज भरण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे - सौ. शितलताई धोंडरे

प्रतिनिधी । बीड

लोकसभेसाठी मतदारसंघातील जनतेच्या येणाऱ्या मागणीतून उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा मी निर्णय घेतला आहे.लोकसभा मतदार संघ - ३९ मधुन मी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणार असुन येणाऱ्या २३ एप्रिल वार मंगळवार रोजी शक्ती प्रदर्शन करून अर्ज भरण्यात येणार आहे. यावेळी जनतेने एकत्र येवून ताकद दाखवावी, व आपली लढाई हि धनशक्ती विरुद्ध जनशक्ती ची असुन मतदाराने याची दक्षता घ्यावी.ही लढाई माझी एकटीची नसून आपल्या सर्वांची आहे, हे दाखवण्यासाठी आपला स्वाभिमान राखून निवडणुक लढवत आहोत. त्यामुळे माझा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आणि आशीर्वाद देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावें, असे आवाहन सौ. शितलताई शिवाजी धोंडरे उमेदवार म्हणून केले आहे.

मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्ष निमित्त निजामकालीन पोलिस स्टेशन नव्याने बांधण्याच्या सुधीर मुनगंटीवार यांच्या घोषणेचं काय झालं ? ?

पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना निवेदन:- डॉ.गणेश ढवळे

प्रतिनिधी । बीड

देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात मराठवाडा प्रदेशाच्या स्वातंत्र्याची ७५ वर्षे साजरी करत असताना सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मराठवाड्यातील ७० निजामकालीन पोलिस ठाण्यांच्या ईमारती नविन बांधण्याची घोषणा केली होती.मात्र निजामकालीन पोलिस ठाण्याच्या ईमारती कालबाह्य झाल्या असुन वापरण्यास योग्य नसल्याने नेकनुर पोलिस सारख्या ठिकाणी पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पत्र्याच्या शेडमध्ये काम करावे लागत असुन सुधीर मुनगंटीवार यांच्या घोषणेचं नेमकं काय झालं असा सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी केला असुन

नेकनुर पोलिस ठाण्याची निजामकालीन ईमारत कालबाह्य झाली असुन पोलिस वसाहत पाडुन वर्षभरापेक्षा जास्त कालावधी झाला असुन सन २०२१-२२ मध्ये जवळपास ६ कोटी ३४ लाख निधी मंजूर होऊनही अद्याप ईमारत बांधकामाला मुहूर्त मिळाला नसुन सध्याची ईमारत पोलिस ठाण्यासाठी अपुरी पडत असुन गैरसोय होत असल्याने आधिकाऱ्यांना पत्र्याच्या शेडमध्ये काम करावे लागत आहे.तसेच पोलिस वसाहत वर्षभरापूर्वी पाडली असुन अद्याप बांधकाम सुरू नसुन कर्मचाऱ्यांना किरायाच्या घरात रहावे लागत असुन तातडीने पोलिस ठाणे ईमारत व पोलीस वसाहत बांधकाम सुरू करण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्यासह शेख युनुस,सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार यांनी पोलिस अधीक्षक बीड नंदकुमार ठाकूर यांच्या मार्फत मुख्यमंत्री, गृहमंत्री यांना केली आहे.

नेकनुर येथील पोलिस ठाण्याची इमारत निजाम कालीन असुन

येथील ईमारत व वसाहत वापरण्यास व राहण्यास योग्य नसल्याने मध्यंतरी नविन ईमारत बांधण्याचा निर्णय घेण्यात आला.यासाठी २०२१-२२ मध्ये जवळपास ६ कोटी ३४ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला होता. येथील पोलिस ठाणे अंतर्गत जवळपास ८१ गावांचा कारभार चालतो.यामध्ये नेकनुर, चौसाळा लिंबागणेश,मांजरसुंभा ,येळंब यासारखी मोठी गावे येतात.

याठिकाणी ४ अधिकारी आणि ४० कर्मचारी कार्यरत आहेत.पोलिस स्टेशनसाठी प्रशस्त जागा असुन आणि शासनाकडून निधी मंजूर होऊन वर्ष उलटूनही बांधकामास सुरुवात नाही. पोलिस स्टेशनची इमारत वापरण्यास कालबाह्य झाली असुन ती सध्या अपुरी पडत असल्याने आधिकाऱ्यांना काम करण्यास पत्र्याचे शेड

तयार करण्यात आले आहे.पोलिस स्टेशनचा आवाका व कारभार मोठा असल्याने याठिकाणी घडणाऱ्या गुन्ह्यांची संख्या मोठी असते.पोलिस स्टेशनची ईमारत छोटी असल्याने पोलिसांना काम करण्यास अडचणी निर्माण होतात.पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना आपले कर्तव्य बजावताना अडचणींचा सामना करावा लागत आहे.त्यामुळे शासनाने पोलिस ठाण्याची ईमारत तातडीने बांधण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

पोलिस वसाहत पाडुन वर्षं उलटुनही बांधकामास सुरुवात नाही; अधिकारी, कर्मचारी किरायाच्या घरात

नेकनुर पोलिस ठाणे अंतर्गत ४ अधिकारी आणि ४० कर्मचारी कार्यरत आहेत.याठिकाणी पोलिसांना राहण्यासाठी घरे देखील होती.परंतु येथील वसाहत राहण्यास व वापरण्यास योग्य नसल्याने नविन बांधण्याचा निर्णय घेण्यात आला.त्यानंतर येथील वसाहत पाडुन वर्षभरापेक्षा जास्त कालावधी उलटूनही अद्याप बांधकामाला सुरुवात नाही त्यामुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांना किरायाच्या घरात रहावे लागत आहे.

ख्यातनाम गायक आनंद शिंदेंचा आज बीड मध्ये बहारदार संगीत रजनी कार्यक्रम..!

रसिक बीडकरांनी बहुसंखेने उपस्थित राहावे - राजेंद्र मस्के

प्रतिनिधी । बीड

गतवर्षी प्रमाणे शिव- फुले- आंबेडकर संयुक्तिक महामानवांच्या जयंती महोत्सवा निमित्त ख्यातनाम भीम गीत गायन सम्राट आनंद शिंदे यांचा बहारदार संगीत रजनीचा खास कार्यक्रम आज सोमवार दि. २२ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ०७.०० वाजता बीड येथील छत्रपती संभाजी महाराज क्रिंडांगण येथे संपन्न होणार आहे. महापुरुषांचे स्मरण व अभिवादन करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित असून, बंधू भगिनींनी बहुसंखेने उपस्थित राहून या शानदार कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

विश्ववंदनीय छत्रपती शिवाजी महाराज, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले यांच्या संयुक्तीक जयंती निमित्त महापुरुषांचे वैचारिक जागरण तथा चरित्र दर्शन त्यांच्या कर्तुत्वाची ओळख आजच्या युवा पिढीपर्यंत जावी. महापुरुषांना सन्मानपूर्वक करण्यासाठी बीड करांच्या परिचयांचे ख्यातनाम गायक आनंद शिंदे यांनी संगीत रजनीच्या माध्यामतून आपला अमुल्य वेळ दिला आहे.कार्यक्रमा साठी भव्य व्यासपीठ, उच्च दर्जाची साउंड व्यवस्था आणि महिला पुरुष ज्येष्ठ नागरिकांना स्वतंत्र बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. हजारो श्रोत्यांच्या साक्षीने संगीत रजनीचा कार्यक्रम बहारदारपणे संपन्न होईल. निवडणूक आचार सहितेमुळे हा कार्यक्रम बरोबर सायंकाळी ०७.०० वाजता सुरु होईल. याची दखल घेऊन रसिक बांधवांनी वेळेवर उपस्थित रहावे. असे आवाहन राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य च्या गणेश चेडे,गणेश जावळे,अतुल तवार,राजनीस कानके यांच्या निवडी जाहीर

प्रतिनिधी । बीड

काल दिनांक २० एप्रिल २०२४ रोजी दुपारी बीड येथील लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य च्या कार्यालया मध्ये लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य प्रदेश उपाध्यक्ष गणेश चेडे (कार,ट्रक ड्रायव्हर विकास समिती), मराठवाडा अध्यक्ष गणेश जावळे (नॅशनल राज्य रस्ते विकास समिती),पैठण तालुका अध्यक्ष अतुल तवार (सरपंच -/ग्रामपंचायत विकास समिती),जालना जिल्हा अध्यक्ष राजनीस कानके यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत.लोकशाही पत्रकार संघाचे सं.अ.भागवत वैद्य यांच्या आदेशाने प्रदेश सचिव हमीद भाई , अनिस भाई जालना जिल्हा अध्यक्ष, मुंबई प्रदेश अध्यक्ष सुलेक्षणा कांबळे(कला,क्रीडा व सांस्कृतिक कार्य विकास समिती),

सौ.मनीषा पैठणकर तुलसीरत्न पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी । बीड

येथील देवगिरी प्रतिष्ठान बीड संचलित तुलसी शैक्षणीक समुह बीड यांच्या वतीने दि.२० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता तुलसी इंग्लिश स्कुल बीड येथे तुलसीरत्न पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तुलसी इंग्लिश स्कूलच्या शिक्षिका सौ.मनीषा पैठणकर तुलसीरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी देवगिरी प्रतिष्ठान बीडचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे, तुलसी शैक्षणिक समूहाच्या प्रेरणास्थान तुळसाबाई रोडे, कॅनरा बँक बीड शाखा व्यवस्थापक सतिष कुमार, निवृत्त, डिवायएसपी.सी.आर. रोडे, निवृत्त शिक्षणाधिकारी माऊली सोनवणे, श्रावस्ती शि.प्र. व बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अध्यक्ष जालना बाळासाहेब दांडगे, आर.डी.जोगदंड, प्रा.राम गायकवाड, तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय प्राचार्य डॉ. एल.एम.थोरात, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन प्राचार्य डॉ.अशोक धुलधुले, तुलसी इंग्लिश स्कुल बीड प्राचार्य उमा जगतकर, नालंदा कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन प्राचार्य डॉ.शैलेजा पैकेकर, मॉडर्न संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर प्राचार्य ज्योती मोरे, प्रशासकीय अधिकारी डॉ.अस्मिता साळवे यांची उपस्थिती होती. तुलसी शैक्षणिक समूहाच्या प्रेरणास्थान तुळसाबाई रोडे हस्ते सौ.मनीषा पैठणकर सन्मानित करण्यात आले.या पुरस्काराचे स्वरुप स्मृती चिन्ह, २५ हजार रुपयांचा धनादेश असे होते. तसेच संस्थेमधील कर्मचारी संतोष प्रधान, ज्योती मोरे यांना ५० हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. यावेळी तुलसी शैक्षणिक समूहातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

भारतीय स्टेट बँक
State Bank Of India
20042024
सौ.मनिषा मनोहर पैठणकर
पंचवीस हजार रुपये फक्त
₹ 25,000/-
प्रा.प्रदिप रोडे
STATE BANK OF INDIA

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT